# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-९५** **दिनांक - १४/०३/२०२४**

## दिवसा घरफोडी करुन चोरी करणाऱ्या ०३ सराईत आरोपी यांना अटक करुन १०१.४१ ग्रॅम सोन्याचे दागिने व रोख रक्कम असे एकुण ७,५२,३६८/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

----००----

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक ०७/०३/२०२४ रोजी १६.०० वा. ते १६.४५ वा. चे दरम्यान रुम नं. बी/१७, अंबा भवन, तिसरा मजला, आनंद नगर, वसई पश्चिम, जि. पालघर येथील बंद घराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने घराचा सेफ्टी दरवाजा कशाचेतरी साहाय्याने तोडुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश करुन लोखंडी कपाटातील स्टील पेटीमध्ये असलेले सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकुण घरफोडी करुन चोरी झालेबाबत तक्रारदार नामे श्रीमती कल्पना नंदकुमार मोरे, वय ६५ वर्षे, त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. ८९/२०२४ कलम ४५४,३८०,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन घटनास्थळावरील मिळालेल्या माहितीच्या व सी.सी.टी.व्ही फुटेजच्या आधारावर तब्बल १५० ठिकाणचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासुन ०३ आरोपीत यांची ओळख पटवुन गुप्त बातमीदार यांचे मदतीने आरोपी यांचे नाव निष्पन्न केले. तसेच तांत्रिक विश्लेषण करुन गुन्हयातील आरोपीत हे गोरखपुर एक्सप्रेसने जात असल्याची खात्री लायक माहिती प्राप्त झाली. तेव्हा नाशिक रोड मध्य रेल्वे पोलीसांचे मदतीने ७२ तासांचे आत आरोपीत नामे १) राकेश कुमार ऊर्फ चक्की रामराज यादव, वय ३३ वर्षे, रा. रुम नं. १४०५, द लक्ष्मी गृह सोसायटी, न्यु मुलुंड, लिंक रोड, मालाड पश्चिम, मुंबई, २) मोहम्मद सईद ऊर्फ शानु गरीबउल्ला खान, वय ३७ वर्षे, रा. रुम नं. १५०, प्रेम नगर, अंकुर बिल्डींगचे मागे, गणेश रहिवासी सेवा मंडळ चाळ, गोरेगांव पश्चिम, मुंबई, ३) लालकेसर ऊर्फ बच्चा ददन राय, वय २७ वर्षे, रा. जानकी पाडा, फादरवाडी, वसई पुर्व, जि. पालघर यांना ताब्यात घेवुन अटक करण्यात आली असुन आरोपीत यांचेकडुन रु ४,६७,५६८/- किंमतीचे १०१.४१ ग्रॅम सोने, रु २,६९,८००/- रोख रक्कम व ०२ मोबाईल फोन असा एकुण अं.किं.रु ७,५२,३६८/- चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. तसेच आरोपीत यांनी सदर गुन्हयात वापरलेली अं.किं.रु. ६०,०००/- किंमतीची ॲक्टिव्हा मोटारसायकल हस्तगत करण्यात आली आहे.

अटक आरोपी नामे **राकेश कुमार ऊर्फ चक्की रामराज यादव** याचेवर दाखल गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ३५२/२०१५ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. |

अटक आरोपी नामे **मोहम्मद सईद ऊर्फ शानु गरीबउल्ला खान** याचेवर दाखल गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ४८१/२००९ कलम ३०२,३४ भा.दं.वि. |
| २. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ४५२/२०१४ कलम ३०७,३४ भा.दं.वि. सह १३५ १ अ मपोका |
| ३. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ३५९/२०१५ कलम ३२४,३२६,५०४,५०६,३४ भा.दं.वि. |
| ४. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ४३८/२०१९ कलम ३९४,३४ भा.दं.वि. |

अटक आरोपी नामे **लालकेसर ऊर्फ बच्चा ददन राय** याचेवर दाखल गुन्हे खालीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. ५५७/२०२३ कलम ३८० भा.दं.वि. |
| २. | गोरेगांव पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र. १०६/२०२४ कलम ४५४,३८० भा.दं.वि. |

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्‌मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (प्रशासन/गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, म.पो.शि. पुजा कांबळे, अमिषा पाटील व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. मोहन खंडवी, यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.